## (महाराष्ट्र पोलीस राजपत्र विभागीय भाग-६अ करिता)

क्र.पोमसं/८-अ/नि.सू.२०१५-१६(उ.श्रे.ल.ले. ते स्वी.स.)/जिल्हा/३८/२०१६ मुंबई, दि.१९/५/२०१७

### -: आदेश :-

पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या अधिपत्याखालील जिल्हा लिपिक संवर्गातील खालील नमुद उच्चश्रेणी लघुलेखकांना कार्यभार स्वीकारल्याच्या दिनांकापासून "स्वीय सहायक, गट-ब (राजपत्रित)" पदावर पदोन्नती देण्यात येत असून, पदोन्नतीवर त्यांची नेमणुक त्यांच्या नावांसमोर दर्शविलेल्या कार्यालयांमध्ये करण्यात येत आहे :-

| अ.क्र | उच्चश्रेणी लघुलेखकाचे नांव | सध्याचे नेमणुकीचे कार्यालय | पदोन्नतीवरील नेमणुकीचे कार्यालय |
|---|---|---|---|
| १ | श्री.सुनिल रामचंद्र गाढवे | पोलीस अधीक्षक, लोहमार्ग, नागपूर | पोलीस आयुक्त, नागपूर शहर |
| २ | श्री.सुनिल अंबादास हिरुरकर | पोलीस अधीक्षक, पुणे ग्रामीण | पोलीस आयुक्त, औरंगाबाद शहर |
| ३ | श्री.सुरेश नामदेव काथार | पोलीस अधीक्षक, जालना | पोलीस अधीक्षक, नांदेड |
| ४ | श्री.धनाजी मारुती कांबळे | पोलीस आयुक्त, पुणे शहर | पोलीस आयुक्त, नाशिक शहर |
| ५ | श्री.राजेंद्र रामचंद्र खर्चे | पोलीस आयुक्त, सोलापूर शहर | पोलीस आयुक्त, लोहमार्ग, मुंबई |
| ६ | श्री.सुनिल रामचंद्र भगत | पोलीस अधीक्षक, अहमदनगर | पोलीस अधीक्षक, सातारा |
| ७ | श्री.दिलीप मधुरकरराव निमजे | पोलीस अधीक्षक, लोहमार्ग, पुणे | संचालक, पोलीस बिनतारी संदेश, पुणे |

**सतीश माथुर,**
पोलीस महासंचालक,महाराष्ट्र राज्य, मुंबई.

प्रति:

पोलीस आयुक्त, नागपूर शहर/नाशिक शहर/पुणे शहर/सोलापूर शहर/औरंगाबाद शहर//लोहमार्ग, मुंबई
संचालक, पोलीस बिनतारी संदेश, म.रा., पुणे.
पोलीस अधीक्षक, लोहमार्ग, नागपूर/लोहमार्ग, पुणे/पुणे ग्रामीण/अहमदनगर/सातारा/नांदेड/जालना

२. शा.नि., वि.वि., क्र.पीएच्वाय्/१०८५/सीआर/११०० (२)/एसईआर-३, दि.६/११/१९८४ अन्वये पदोन्नतीनंतर कनिष्ठ पदावर वेतनवाढ दिल्यानंतर वेतननिश्चिती करण्याबाबत विकल्प द्यावयाचा असेल, तर तो पदोन्नतीवर हजर झालेल्या दिनांकापासून १ महिन्याच्या आत द्यावा व अशाप्रकारचा विकल्प न दिल्यास पदोन्नत पदावरील वेतननिश्चिती म.ना.से.(वेतन)नियम,११ (१),(अ), अन्वये केली जाईल, याची संबंधीत उच्चश्रेणी लघुलेखकांना नोंद घेण्यास सांगावे.

३. उपरोक्त उच्चश्रेणी लघुलेखकांना आता निलंबित केले असेल, किंवा त्यांच्याविरुध्द नव्याने विभागीय चौकशी प्रलंबित असेल, किंवा न्यायालयात खटला चालू असेल, न्यायालयाने पदोन्नतीसाठी आक्षेप नोंदविलेला असेल, किंवा न्यायालयाने दिलेल्या इतर निर्णयांविरुध्द वरिष्ठ न्यायालयात अपिल प्रलंबित असेल, किंवा जर

एखादी शिक्षा भोगत असतील तर त्यांना पदोन्नती न देता सविस्तर अहवाल या कार्यालयास पाठवून पुढील आदेशांची कृपया वाट पहावी.

४. संबंधीत घटक प्रमुखांनी उपरोक्त उच्चश्रेणी लघुलेखकांविरुध्द वरीलप्रमाणे काहीच प्रलंबीत नसेल तर, पदोन्नतीवर पर्यायी उच्चश्रेणी लघुलेखकांची वाट न पाहता, नियुक्तीच्या ठिकाणी तात्काळ कार्यमुक्त करावे, आणि त्याप्रमाणे या कार्यालयास कळवावे. संबंधीत घटक प्रमुखांनी कोणत्याही परिस्थितीत संबंधीतांना कार्यमुक्त न केल्यास त्यांची संपूर्ण जबाबदारी संबंधीत घटक कार्यालयाची राहील.

५. वरील नमुद उच्चश्रेणी लघुलेखक हे पदोन्नतीवर जाण्यास इच्छुक नसतील तर त्यांनी तसा अर्ज ७ दिवसांचे आत (दिनांक २३/०५/२०१७ पर्यत ) घटक प्रमुखांचे मार्फत ह्या कार्यालयास सादर करावा. तसा अर्ज त्यांनी सादर न केल्यास घटक प्रमुखांनी त्यांना दिनांक २३/०५/२०१७ रोजी न चुकता कार्यमुक्त करावे व अनुपालन अहवाल या कार्यालयास सादर करावा.

६. पदोन्नती आदेशानंतर संबंधीत उच्चश्रेणी लघुलेखक यांनी रुग्ण निवदेन केल्यास अथवा गैरहजर राहिल्यास त्यांना रुग्ण निवदेनाच्या तारखेपासून स्थित कार्यमुक्त (Stand relieved) करण्यात यावे, व त्यांना कार्यमुक्त केल्याचा आदेश त्यांच्या निवासस्थानी बजवावा.

प्रत :

अपर पोलीस महासंचालक, लोहमार्ग, म.रा., मुंबई
विशेष पोलीस महानिरीक्षक, नागपूर परिक्षेत्र, नागपूर / कोल्हापूर परिक्षेत्र / नाशिक परिक्षेत्र/ नांदेड परिक्षेत्र/ औरंगाबाद परिक्षेत्र
पोलीस उप अधीक्षक, संगणक कक्ष, पोलीस महासंचालक कार्यालय.
कार्यासन अधिकारी, कार्यासन क्र. १०, १२

(अनुपकुमार सिंह)
विशेष पोलीस महानिरीक्षक (प्रशासन)
पोलीस महासंचालक यांचेकरीता.